ISO 9001-2008

# डॉ. बाळासाहेब सावंत कोकण कृषि विद्यापीठ

पो. ता. दापोली - ४१५ ७१२, जि. रत्नागिरी.


जा. क्र. डॉ. बासाकोकृवि/बांधकाम/अे-३/ 1171 /२०२३ दिनांक : 6 JUN 2023

## दरपत्रक सुचना

**विषय -:डॉ बाळासाहेब सावंत कोकण कृषि विद्यापीठ, दापोली अंतर्गत कृषि महाविद्यालय, दापोली येथील फॅकल्टी २ ब्लॉक व ३ ब्लॉक इमारत तसेच विशेष अतिथी भवन येथे पावसाच्या पाण्याची झड व गळती थांबविण्याकरीता शेडनेट खरेदी करणे.**

डॉ बाळासाहेब सावंत कोकण कृषि विद्यापीठ, दापोली अंतर्गत कृषि महाविद्यालय, दापोली येथील फॅकल्टी २ ब्लॉक व ३ ब्लॉक इमारत तसेच विशेष अतिथी भवन येथे पावसाच्या पाण्याची झड व गळती थांबविण्याकरीता शेडनेट खरेदी करणेसाठी दरपत्रक हे सीलबंद लखोटयामध्ये **"विद्यापीठ अभियंता, डॉ. बाळासाहेब सावंत कोकण कृषि विद्यापीठ, दापोली, जि. रत्नागिरी"** यांचे नावे सदर कार्यालयात दरपत्रक सुचना प्रसिध्द केल्याच्या दिनांका पासून म्हणजेच **दिनांक ०६/०६/२०२३ पासून दिनांक १२/०६/२०२३ पर्यंत** दुपारी १३.०० वाजेपर्यंत दरपत्रक सादर करण्यात यावे. शक्य झाल्यास प्राप्त दरपत्रके **दिनांक १२/०६/२०२३** रोजी दुपार नंतर निम्नस्वाक्षरीकार यांच्या दालनात उघडण्यात येतील. **दरपत्रकातील दर हे सर्व करांसहीत असावेत.** तसेच दरपत्रक सुचना विद्यापीठाच्या **www.dbskkv.org** या संकेत स्थळावर प्रसिध्द करण्यात आली आहे. आवश्यक साहित्यांचा तपशील खालील प्रमाणे आहे.

| अ.क्रं. | तपशिल | आवश्यक नग | दर (प्रति मीटर) | रक्कम रु. |
|---|---|---|---|---|
| १. | शेडनेट (ग्रीन ९० टक्के)<br>६.०० मीटर रुंदीचे | २६० मीटर | | |
| | | | एकूण रक्कम रु. | |

**अटी व शर्ती -:**

१. दरपत्रकासोबत पॅन कार्ड किंवा जी.एस.टी. प्रमाणपत्र सत्यप्रतीसह सादर करणे बंधनकारक आहे.
२. दरपत्रकामध्ये जी.एस.टी. दराबाबत विस्तृत तपशिल असावा.
३. ज्या पुरवठादाराचे सर्वात कमी दराचे दरपत्रक स्विकारण्यात येईल त्यास त्यांनी सादर केलेल्या दराच्या ३ टक्के सुरक्षा अनामत रक्कम देयकातून कपात करणेत येईल. सदरची रक्कम पुरविण्यात आलेले साहित्य योग्य असल्याची खातर जमा केल्यानंतर ठेकेदाराच्या मागणीनुसार परत करण्यात येईल.
४. दर सादर करताना ते For ता. दापोली, जि. रत्नागिरी करिता असे असावे.
५. विहीत दिनांकानंतर प्राप्त झालेल्या दरपत्रकांचा विचार करण्यात येणार नाही, याची नोंद घ्यावी.
६. सिलबंद लखोटयाच्या वरील बाजूस विषय व अंतिम मुदतीचा स्पष्ट उल्लेख केलेला असावा.
७. कोणत्याही कारणाशिवाय दरपत्रक स्विकारणे अथवा नाकारणेचा अधिकार या कार्यालयाकडे राखून ठेवण्यात येत आहे.

6/6/2023

(एन.एम.कुळकर्णी)
**विद्यापीठ अभियंता,**

प्रत : माहितीसाठी/प्रसिध्दीसाठी

१. सहाय्यक अभियंता, मध्य बांधकाम उपविभाग, डॉ. बा. सा. को. कृ. वि., दापोली, जि. रत्नागिरी.
२. श्री.आर.बी.घाडगे, शाखाअभियंता (स्थापत्य), मध्य बांधकाम उपविभाग, डॉ. बा. सा. को. कृ. वि., दापोली, जि. रत्नागिरी.
३. प्रभारी अधिकारी, कृषि ज्ञानव्यवस्थापन कक्ष, डॉ. बा. सा. को. कृ. वि., दापोली, जि. रत्नागिरी.
४. विद्यापीठ नोटीसबोर्ड.